आपले सरकार सेवा केंद्रबाबत केंद्र शासनाच्या CSC २.० अंतर्गत मार्गदर्शक सूचनेबाबतच्या तरतुदींमध्ये सुधारणा करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग**

**शासन शुध्दिपत्रक क्रमांक : आसेकें-२०२६/प्र.क्र.९८/TECH-1 (E-1742666)**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक: ०९ जुलै, २०२६

**संदर्भ:** १. सा.प्र.वि. (माहिती तंत्रज्ञान) विभाग शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दि.१९ जानेवारी, २०१८.

२. सा.प्र.वि. शासन शुद्धिपत्रक क्रमांक:मातंसं-०४८/प्र.क्र.१/२०२५, दिनांक ०२ जून, २०२५

३. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग शासन निर्णय आसेकें-२०२६/प्र.क्र.६३/मातं, दिनांक २३ जून, २०२६. (E-1602482)

४. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.

**प्रस्तावना:**

सा.प्र.वि. (माहिती तंत्रज्ञान) विभाग शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दि.१९ जानेवारी, २०१८ मधील परिच्छेद क्र. २.५ (क) मध्ये दिनांक ०२ जून, २०२५ रोजीच्या शासन शुद्धिपत्रकान्वये बदल करण्यात आला होता. तथापि, सदर बाबीमध्ये अधिक स्पष्टता आणण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन शुध्दिपत्रक:**

जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत सेतू प्रभारी अधिकारी व जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक हे संयुक्तरीत्या अर्जाची छाननी पार पाडतील. तसेच दि. २३/०८/२००२ च्या शासन निर्णयान्वये स्थापित केलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा सेतू समिती समोर सदर प्रस्ताव ठेवून आपले सरकार सेवा केंद्र देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. आपले सरकार सेवा केंद्र प्रदान करण्यासाठी त्या-त्या भौगोलिक क्षेत्रात एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास खालीलप्रमाणे प्रक्रिया राबवून गुणांकन करण्यात येईल.

१) समितीव्दारे खालीलप्रमाणे गुणांकनाची व मुलाखतीची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. तसेच सदर समितीचा निर्णय अंतिम असेल.

२) सदर निवड प्रक्रियेमध्ये १०० गुण निर्धारीत करण्यात येतील तर गुणांची विभागणी खालीलप्रमाणे असेल:-

१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असल्यास ३०- गुण

२) कोणत्याही शाखेचा पदव्युत्तर असल्यास २५-गुण

३) सीएससी केंद्र असल्यास २५ गुण

४) समितीकडील मुलाखतीचे गुण २० - गुण

मुलाखतीच्या गुणांची विभागणी खालीलप्रमाणे राहील:-

- तांत्रिक ज्ञान असल्यास - ०६ गुण
- लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ चे ज्ञान असल्यास ०४ गुण

➢ सामान्य ज्ञान व व्यक्तिमत्व, सामाजिक क्षेत्रात राबविलेले उपक्रम
अथवा सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा अनुभव असल्यास १० गुण

**"याऐवजी खालीलप्रमाणे वाचावे"**

जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत सेतू प्रभारी अधिकारी व जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे संयुक्तरीत्या अर्जाची छाननी पार पाडतील. तसेच दि. २३/०८/२००२ च्या शासन निर्णयान्वये स्थापित केलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा सेतू समिती समोर सदर प्रस्ताव ठेवून आपले सरकार सेवा केंद्र देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना गुणवत्तापूर्ण, पारदर्शक, वेळेवर आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देण्यासाठी व्हिलेज लेव्हल आंत्रप्रेन्युअर (VLE) यांची निवड केवळ किमान पात्रतेच्या आधारे न करता त्यांची शैक्षणिक गुणवत्ता, डिजिटल कौशल्य, पायाभूत सुविधा, आर्थिक क्षमता, प्रामाणिकपणा आणि नागरिकाभिमुख सेवा देण्याची क्षमता या सर्व बाबींच्या आधारे करण्याच्या अनुषंगाने आपले सरकार सेवा केंद्र प्रदान करण्यासाठी त्या-त्या भौगोलिक क्षेत्रात एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास खालीलप्रमाणे प्रक्रिया राबवून गुणांकन करण्यात येईल.

**१) गुणांकनावर आधारित निवड निकष (एकुण १०० गुण)**

| निकष | गुण | मूल्यांकनाचे निकष |
|---|---|---|
| शैक्षणिक पात्रता | १० | किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) उत्तीर्ण; पदवी, पदविका किंवा व्यावसायिक पात्रतेस अतिरिक्त गुण (किमान शैक्षणिक अहर्ता असल्यास ५ गुण, पदवी असल्यास २ अतिरिक्त गुण, पदव्युत्तर असल्यास ५ अतिरिक्त गुण) |
| संगणक व डिजिटल साक्षरता | १५ | MSCIT किंवा समकक्ष प्रमाणपत्र, संगणक हाताळणी, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, सायबर सुरक्षा यांचे ज्ञान |
| पायाभूत सुविधा | १५ | स्वतंत्र कार्यालय, संगणक, प्रिंटर, स्कॅनर, बायोमेट्रिक उपकरण, इंटरनेट, वीज बॅकअप, सीसीटीव्ही, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभ प्रवेश |
| आर्थिक क्षमता | १० | आवश्यक गुंतवणूक करण्याची व किमान ६ ते १२ महिने व्यवसाय चालविण्याची आर्थिक क्षमता |
| ग्राहक सेवा व संवाद कौशल्य (मुलाखतीद्वारे) | २० | संवाद कौशल्य, तक्रार निवारण क्षमता, प्रामाणिकपणा व नागरिकाभिमुख दृष्टिकोन |
| अनुभव | १० | सीएससी, महा-ई-सेवा केंद्र, बँकिंग प्रतिनिधी, ई-गव्हर्नन्स किंवा तत्सम क्षेत्रातील अनुभव |
| व्यवसाय आराखडा व शाश्वतता | ०५ | सेवा विस्तार, जनजागृती, आर्थिक व्यवहार्यता आणि व्यवसाय नियोजन |
| सामाजिक समावेशकता | ०५ | शासनाच्या धोरणानुसार दिव्यांग, माजी सैनिक, महिला, स्वयंसहाय्यता गट सदस्य किंवा स्थानिक उद्योजकांना प्राधान्य |
| चारित्र्य पडताळणी | १० | पोलीस पडताळणी, फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार किंवा शासकीय काळ्या यादीत नसणे |
| **एकूण गुण** | १०० | |

**२) किमान पात्रता:**

अर्जदाराने खालील अटी पूर्ण करणे आवश्यक राहील.

१. किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे.

२. किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) उत्तीर्ण असावा.

३. संगणकाचे मूलभूत ज्ञान आवश्यक राहील. MSCIT किंवा समकक्ष प्रमाणपत्रास प्राधान्य देण्यात येईल.

४. संबंधित ग्रामपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्राचा स्थानिक रहिवासी असावा.

५. आधार क्रमांक, पॅन, बँक खाते व आवश्यक ओळखपत्र उपलब्ध असावे.

६. नैतिक अधःपतन, आर्थिक फसवणूक किंवा सायबर गुन्ह्याबाबत दोषी ठरलेला नसावा.

**३) पायाभूत सुविधा:**

प्रत्येक सेवा केंद्रामध्ये किमान खालील सुविधा असणे आवश्यक राहील.

- किमान १०० चौ.फुट कार्यालयीन जागा
- दोन संगणक/लॅपटॉप
- लेझर प्रिंटर
- स्कॅनर
- बायोमेट्रिक उपकरण
- वेबकॅम
- युपीएस अथवा पर्यायी वीज बॅकअप
- ब्रॉडबँड इंटरनेट ( ग्रामीण 10 mbps नागरी 20 mbps )
- सीसीटीव्ही व्यवस्था
- नागरिकांसाठी प्रतीक्षाकक्ष
- शासनप्राधिकृत सेवा शुल्क दर्शविणारा फलक व बाह्य नामफलक

**४) मुलाखत:**

जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत अर्जदारांची संरचित मुलाखत घेण्यात येईल. मुलाखतीमध्ये खालील बाबींचे मूल्यांकन करण्यात येईल.

- शासकीय सेवांचे ज्ञान
- नागरिकाभिमुख सेवावृत्ती
- डिजिटल प्रणाली हाताळण्याची क्षमता
- समस्या सोडवण्याची क्षमता
- संवाद कौशल्य
- प्रामाणिकपणा व नैतिकता
- माहिती गोपनीयता व डेटा सुरक्षा याबाबत जागरूकता

**५) कार्यप्रदर्शनावर आधारित करार नुतनीकरण:**

निवड झालेल्या VLE ला प्रारंभी ३ वर्षाचा करार देण्यात यावा. पुढील नुतनीकरण खालील कार्यप्रदर्शन निर्देशकांच्या आधारे करण्यात यावे.

- केलेल्या व्यवहारांची संख्या
- नागरिक समाधान निर्देशांक
- सेवा देण्यास लागणारा सरासरी कालावधी
- प्राप्त तक्रारींची संख्या व त्यांचे निराकरण
- लेखापरिक्षणातील अनुपालन
- प्रणालीची कार्यक्षमता (System uptime)
- आर्थिक शिस्त
- शासनाच्या विविध मोहिमांमध्ये सहभाग

**६) अपात्रता निकष:**

खालील परिस्थितीत अर्जदारास अपात्र ठरवण्यात यावे.

- खोटी किंवा बनावट कागदपत्रे सादर करणे.
- कोणत्याही शासकीय योजनेतून काळ्या यादीत समाविष्ट असणे.
- आर्थिक फसवणूक अथवा सायबर गुन्ह्यांची प्रलंबित गंभीर प्रकरणे असणे.

**७) निवड प्रक्रिया:**

१. अर्जाची प्राथमिक छाननी व पडताळणी.
२. गुणांकनाच्या आधारे कागदपत्रांचे परीक्षण.
३. प्रस्तावित कार्यालयाची प्रत्यक्ष पाहणी.
४. पोलीस पडताळणी.
५. जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत संरचित मुलाखत.
६. १०० गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी (Merit List) तयार करणे.
७. प्राथमिक निवड यादी प्रसिद्ध करून हरकती मागविणे.
८. अंतिम निवड व नियुक्ती आदेश देणे.
९. अनिवार्य प्रशिक्षण व ६ महिन्यांचा परिविक्षाधिन कालावधी
१०. समाधानकारक कार्यप्रदर्शनानंतर नियमित मान्यता.

**८) अंमलबजावणी:** या शासन शुद्धिपत्रकातील तरतुदी राज्यातील सर्व नवीन आपले सरकार सेवा केंद्रांच्या निवडीस लागू राहतील. तसेच विद्यमान VLE यांचे करार नूतनीकरण करताना देखील या शासन शुद्धिपत्रकातील निकषांचा विचार करण्यात येईल.

२. सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०७०९१३००४६३९११ असा आहे. हे शासन शुध्दिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DURGAPRASAD
POCHAYYA MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI,
2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.07.09 13:01:45 +05'30'

**(दुर्गाप्रसाद मैलावरम)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) मा. उप मुख्यमंत्री ( नगर विकास व गृहनिर्माण ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
९) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
१०) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११) शासनाचे सर्व मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
१३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१५) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१७) सर्व पोलीस आयुक्त,
१८) सर्व विभागीय आयुक्त,
१९) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
२१) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
२२) सर्व जिल्हाधिकारी,
२३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२४) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी,
२५) सर्व मंत्रालयीन विभाग,
२६) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२७) निवडनस्ती